संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नाथ षष्ठी आणि समष्टी

**अबीर गुलाल उधळित रंग,**
**नाथाघरी नाचे माझा सखा पांडुरंग।**

**पांडुरंगाच्या** भक्तीतली तल्लिनता लक्षात घेतली तर त्यामध्ये आलेला नाथ हा शब्द भक्ताला सनाथ करणारा कसा आहे. ते स्पष्ट होते. आज नाथ षष्ठी म्हणजे महाराष्ट्राच्या संतांनी निर्माण केलेल्या पूर्वपुण्याईस उतराई होण्याचा तितकाच पुण्यपावन दिवस. ज्या पैठणमध्ये नाथांनी आपल्या आयुष्याचे सोने केले. त्या पैठणमध्ये आज भक्तांची मांदियाळी पाहायला मिळते. त्यांच्या त्या प्रसिध्द वाङ्मयामध्ये असलेला रांजण पाण्याने पुन्हा ओतप्रोत भरतो. त्यांच्यासाठी पांडुरंगाने कीर्तनाच्यावेळी नाथांना दर्शन दिले. हे दर्शन म्हणजे नाथांच्या भक्तीविषयी पांडुरंगाने व्यक्त केलेली आपल्या भक्ताविषयीची कृतज्ञताच म्हणावी लागेल. खरे तर नाथांच्या घरामध्ये परंपरेने दत्तभक्ती होत आली. नाथांनादेखील जनार्दन स्वामींचा अनुग्रह लाभला . दत्तभक्ती करता करताच त्यांची विठ्ठल भक्ती जागी झाली. आणि त्यांच्या घराण्याच्या विद्वत्तेला जणूकाही परिसस्पर्श झाला. नाथांनी अक्षरशः शेकडो अभंग रचले. परंतु त्यांच्या या विठ्ठल भक्तीचा कळस म्हणजे त्यांनी लिहीलेले नाथ भागवत म्हणजे श्रीमद्‌भागवताची दिव्य अवतरणिकाच म्हणायला हवी. भागवताच्या एकादश स्कंधावर नाथांनी केलेले हे निरूपण म्हणजे कृष्णभक्तीचा दिव्य आविष्कार ठरतो. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरी , तुकोबाची गाथा, त्याप्रमाणे नाथांचे एकनाथी भागवत महाराष्ट्राच्या भक्तीसंप्रदायामध्ये मान्यता पावले आहे. नाथांचे अभंग असो किंवा त्यांचे एकनाथी भागवत असो. त्यामध्ये कोणताही भक्त मनाने रममाण तर होतोच परंतु त्याची भक्तीच्या तत्त्वज्ञानाविषयीची उत्सुकताही जागृत होते. यासाठी परमेश्वराला शरण जाताना भक्तीचा हा अबीर गुलाल पांडुरंगाच्या रंगामध्ये विलीन करतो. शेकडो वर्षानंतरही नाथांविषयीचा आदरभाव टिकून राहातो. याचा अर्थ भागवत धर्माची ध्वजा दिंगत काल अशीच फडकत ठेवण्याचे व्रत महाराष्ट्राने स्वीकारले आहे हे सिध्द होते. अनेक संतांचा जन्म या महाराष्ट्र भूमीत झाला. ज्ञानोबा,तुकोबा, संत नामदेव, चोखोबा , सावता माळी, जनाबाई असे फार मोठे संत अवतारांचे संचित महाराष्ट्राला लाभले.

## हरिभक्तीचा संस्कार

नाथांनी विठ्ठल भक्ती जनमानसावर बिंबावी म्हणून तसेच हरिनामाचे चिंतन कसे होईल असाही प्रयोग त्यांनी स्वतंत्र हरिपाठ लिहून केला. त्यामध्ये सुरुवातीलाच त्यांनी हरिचे चिंतन केले की सर्व चिंता दूर होतात अशा प्रकारचे आश्वासनच देऊ केले होते. त्यामध्ये ते म्हणतात.

हरिचिया वासा हरि दाही दिशा।
भावे जैसा तैसा हरि एक।
हरि मुखी गाता हरपली चिंता।
त्या नाही मागुता जन्म घेणे।।

वारकरी संप्रदायामध्ये माऊलींच्या हरिपाठाप्रमाणे नाथांचाही हरिपाठ मोठ्या भक्तीभावाने गायला जातो. कीर्तनातून प्रवचनातून विठ्ठल भक्तीचा वेगळाच आनंद प्राप्त केला जातो. एवढेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी नामसंकीर्तन सप्ताह चालू असतात किंवा प्रत्यक्ष वारीच्या काळात रात्री मुक्कामाच्या ठिकाणी नाथांचे भारूड तितक्याच भक्तीने म्हटली जातात. नाथांची अनेक भारूडे प्रसिध्द आहेत. त्यातून विठ्ठलभक्तीचे संवर्धन करीत असताना जीवनातल्या मनुष्यस्वभावाच्या विचित्रपणावर बोट ठेवले जाते. हे व्यंग भारूडातून मांडत असताना नकळतपणे जीवनाचे तत्त्वज्ञानही सांगितले जाते. महाराष्ट्राच्या संत परंपरेचे एक मोठे वैशिष्ट्य आहे. कोणतेही मोठे लौकिक शिक्षण न घेतलेले हे संत सगळ्या सृष्टीचे किंवा ब्रह्मांडाचे रहस्य उलगडून दाखवतात आणि मनुष्याच्या मनापासून ते समाजाच्या सौजन्यापर्यंत संस्कारांचे सिंचन करीत राहतात. आजच्या आधुनिक युगामध्ये स्वतःच्या बुध्दीची पोपटपंची करणाऱ्यांना प्रज्ञा किंवा प्रतिभेचे ईश्वरी दान काय असते. हे समजून घ्यायचे असेल तर त्यांनी महाराष्ट्रातल्या या संतांच्या अभंगांचे पाठांतर केले पाहिजे. पाठांतर केलेले हे अभंग जीवनाला सुगंध प्राप्त करून देतात. एवढेच नव्हे तर भगवंत आणि भक्त यांच्यातले नातेही अभंग करतात. अशी हे दिव्यत्वाचे दर्शन घडवणारे नाथांचेही अभंग भक्तीचे रंग उधळतात. आणि मग ती तन्मय अवस्था पाहून तो पांडुरंगही नाचायला लागतो. अनेकांना ही मनाने केलेली कल्पना वाटू शकेल. परंतु ज्यांचे आयुष्य संतांच्या संगतीतच गेले आणि ज्यांनी पांडुरंगाशिवाय दुसरा रंगच पाहिलेला नाही. त्यांनी हे एकेकाळी प्रत्यक्ष अनुभवलेले आहे.

## दुष्कृताला सुकृताकडे नेणारा

आज संत एकनाथांचा जन्मदिवस हा केवळ त्यांना नमस्कार करण्यासाठी नाही तर त्यांनी हजारो पिढ्यांना भक्तीचा आश्रय दिला. भक्तीला खऱ्या अर्थाने सनाथ केले. अशा नाथांविषयी उपकार मानण्याचा आहे. व्यक्तीला त्रस्त करून सोडणारे षडविकार भक्तीतून नाहीसे होतात. आणि ही भक्ती कशी करावी याचे दान नाथांसारखे संत करीत राहातात.

त्यासाठीच ते म्हणतात,

बहुतां सुकृती नरदेह लाधला।
भक्तिवीण गेला अधोगती।
बाप भाग्य कैसे न सरेचि कर्म।
न कळेचि वर्म अरे मूढा।।

मिळालेले हे सुकृत कारणी लागावे हाच त्यामागचा नाथांचा हेतू होता. म्हणूनच प्रत्येक वारकरी त्या पांडुरंगाकडे एकच मागणे मागत असतो. हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा. कारण मिळालेल्या जीवनाचे वरदान त्याला सत्कारणी लावायचे असते. संतांची केवळ संगतीच नव्हे तर त्यांच्या मुखातून केली गेलेली ईश्वराची स्तुती जीवनाचे सत्य उलगडून दाखवते. त्या सर्व भक्तांचा विश्वास असतो. तुकाराम बीज, नाथ षष्ठी असे हे फाल्गुन वद्यात येणारे दोन्ही निमित्त एकाचवेळी ईश्वर भक्तीचे खऱ्या अर्थाने जागरण करायला उद्युक्त करतात. महाराष्ट्राच्या अनेक भागात या निमित्ताने नामस्मरण सप्ताह आयोजित केले जातात.समाजाला दुष्कृताकडून सुकृताकडे नेणारा हा संत उपदेश जीवनाची यतार्थता पटवून देतात. काळाप्रमाणे समाज कितीही बदलला तरी जगण्याचे सनातन सत्य बदलत नाही. म्हणूनच नाथ षष्ठीचा या समष्टीशी असलेला संबंधही तितकाच महत्त्वाचा ठरतो.